# बहि:शाल शिक्षण मंडळ

# शैक्षणिक वर्ष : २०१८ - १९

**ज्ञान – विज्ञान वाचन चळवळ**

महात्मा गांधी विद्यामंदिर संचालित, लोकनेते व्यंकटराव हिरे महाविद्यालयात गुरुवार, दि. ३०/०८/२०१८ रोजी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, बहिःशाल मंडळ अंतर्गत "ज्ञान-विज्ञान वाचन चळवळीचे" उद्घाटन तरूण मराठी लेखक व साहित्यिक प्रा. डॉ. तुषार चांदवडकर यांच्या व्याख्यानाने करण्यात आले. डॉ. तुषार चांदवडकर यांनी वीणा गवाणकर यांच्या 'एक होता कार्व्हर' या सुप्रसिद्ध कादंबरीवर आपले मनोगत व्यक्त केले. याबरोबरच विद्यार्थ्यांमध्ये वाचन संस्कृती वाढीस लागण्यासाठी विविध पक्रम सांगितले. तसेच विद्यार्थ्यांनी किती वाचन केले यापेक्षा काय वाचले पाहिजे हे ही महत्त्वाचे आहे त्यामुळे वाचनासाठी पुस्तक निवडीचे तंत्रही त्यांनी विद्यार्थ्यांना सुचविले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बापूसाहेब जगदाळे यांनी भारताचे माजी पंतप्रधान व कवी भारतरत्न स्व. अटलबिहारी वाजपेयी यांना श्रद्धांजली अर्पण करून आपले अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले. आपल्या मनोगतात त्यांनी डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या पासून स्व. अटलबिहारी वाजपेयी यांच्या पर्यंत वाचनाने मणुष्य कसा समृध्द होतो, याचा आढावा घेतला.

शुक्रवार, दि. ३१/०८/२०१८ रोजी प्रा. सोमनाथ पावडे यांनी "माझी जन्मठेप" या स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर यांच्या पुस्तकावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. स्वातंत्र्यवीर सावरकरांचे जीवनचरित्र संघर्षमय होते. तरुणांसाठी प्रेरणादायी आहे. आजचा तरुण हा सोशल मीडियाच्या आहारी गेला आहे. थोड्या थोड्या संघर्षांवरून आत्महत्येसारखं टोकाचं पाऊल उचलतो आहे. या अशा लोकांसाठी स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकरयांचे माझी जन्मठेप हे पुस्तक निश्चितच पथदर्शक आहे. असे प्रतिपादन प्रा.सोमनाथ पावडे यांनी केले. शनिवार, दि. ०१/०९/२०१८ रोजी डॉ. राजेश झनकर यांनी "ब्लास्फेमी" या अनुवादीत पुस्तकासंबंधी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. एक स्त्री म्हणून जन्माला आलेल्या व अत्यंत खडतर आयुष्यात संघर्ष करणा-या व्यक्तिमत्वाची कहाणी डॉ. झनकर यांनी मांडली.

**डॉ. बाबासाहेब जयकर व्याख्यानमाला**

महात्मा गांधी विद्यामंदिर संचालित, लोकनेते व्यंकटराव हिरे महाविद्यालयात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ बहि:शाल शिक्षण मंडळांतर्गत गुरुवार, दि. २३/०८/२०१८ ते शनिवार दि.२५/०८/२०१८ या कालावधीत डॉ. बाबासाहेब जयकर व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली.

गुरुवार, दि.२३/०८/२०१८ रोजी डॉ. बाबासाहेब जयकर व्याख्यानमालेत डॉ. श्यामकुमार दुसाने यांनी "शरीरस्वास्थ्य आणि व्यसन मुक्ती" या विषयावर व्याख्यान दिले. या धकाधकीच्या जीवनात प्रत्येक मणुष्य धडपड करताना दिसतो. ही धडपड करीत असताना आपण आपल्या अनमोल शरीराकडे दुर्लक्ष करतो. आजचा तरूण मोठ्या प्रमाणावर व्यसनांच्या विळख्यात अडकत चाललेला दिसतो. त्यातून त्यांना परावृत्त करण्याचा प्रयत्न डॉ. दुसाने यांनी आपल्या व्याख्यानातून केला. या धकाधकीच्या जीवनात प्रत्येक मणुष्य धडपड करताना दिसतो. ही धडपड करीत असताना आपण आपल्या अनमोल शरीराकडे दुर्लक्ष करतो. आजचा तरूण मोठ्या प्रमाणावर व्यसनांच्या विळख्यात अडकत चाललेला दिसतो. त्यातून त्यांना परावृत्त करण्याचा प्रयत्न डॉ. दुसाने यांनी आपल्या व्याख्यानातून केला. महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. अरूण पाटील यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतात शरीर स्वास्थ्याबरोबरच मानसिक स्वास्थ्य जपणेही आवश्यक असल्याचे सांगितले. मणुष्याचे जीवनातील बरेचसे यशापयश हे त्याच्या मेहनतीबरोबरच मानसिकतेवरही अवलंबून असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले.

**संत गाडगेबाबा ज्येष्ठ नागरिक व्याख्यानमाला**

महात्मा गांधी विद्यामंदिर संचालित, लोकनेते व्यंकटराव हिरे महाविद्यालयात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ बहि:शाल शिक्षण मंडळांतर्गत संत गाडगेबाबा ज्येष्ठनागरिक व्याख्यानमाला गुरुवार, दि. २७/०८/२०१८ ते शनिवार दि.२९/०८/२०१८ या कालावधीत आयोजित करण्यात आली. या व्याख्यानमालेत गुरुवार, दि. २७/०८/२०१८ रोजी "कुटुंबव्यवस्था आणि मानसिक स्वास्थ्य" या विषयावर प्राचार्य के. मा. मोरे यांनी मार्गदर्शन केले. ते पुढे असेही म्हणाले की, कुटुंबातील ज्येष्ठ व्यक्तींना सन्मानाने, आदराने वागणूक दिली पाहिजे. ब-याचदा नवरा, बायको आणि

मुलं यातंच कुटुंब हरवून जाते. कुटुंबात ज्येष्ठांची अडचण होऊ लागते. पण लहान मुलांवर ख-या अर्थाने आजी आजोबा उत्तम संस्कार करतात, त्यांच्यात नितीमूल्ये रूजवतात. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बापूसाहेब जगदाळे यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतात मानसिक स्वास्थ्याचे जीवनातील महत्व अधोरेखित केले. तसेच सोशियल मिडीयाच्या विळख्यात अडकत चाललेल्या समाजाबद्दल खंतही व्यक्त केली. कुटुंबातील चार माणसे चार दिशांना हातात फोन घेऊन बसतात. यात कौटुंबिक सुख हरवत चाललंय असेही ते म्हणाले. शुक्रवार, दि.२८/०८/२०१८ रोजी डॉ. विजयकुमार कर्नाटकी यांनी "शेक्सपियर : नाट्यसृष्टीचा बादशाह" या विषयावर व्याख्यान दिले. शेक्सपियरच्या नाटकांचा आढावा घेताना एक साहित्यिक, एक प्रतिभावंत, एक सहृदय माणूस म्हणून शेक्सपियर किती महान आहे हे अनेक उदाहरणांच्या सहाय्याने विजयकुमार कर्नाटकी यांनी सांगितले. शनिवार दि. २९/०८/२०१८ रोजी डॉ. गजकुमार शहा यांनी "गड – दुर्गांचे ऐतिहासिक योगदान" या विषयावर व्याख्यान दिले. गड, किल्ले, दुर्ग ही महाराष्ट्राची सांस्कृतिक आणि ऐतिहासिक ओळख आहे. या सांस्कृतिक वारशाचे जतन करणे ही आपल्या प्रत्येकाची जबाबदारी असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बापूसाहेब जगदाळे यांनी डॉ. गजकुमार शहा यांच्या कार्यास शुभेच्छा देऊन त्यांचे स्वागत केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक बहि:शाल शिक्षण मंडळाचे केंद्रकार्यवाह डॉ. किरण पिंगळे यांनी केले. याप्रसंगी उपप्राचार्य डॉ. अरुण पाटील, विज्ञान शाखा प्रमुख डॉ. नंदू पवार, वाणिज्य शाखा प्रमुख डॉ. विनीत रकिबे, डॉ. मीनाक्षी पाटील, प्रा. ललित राऊत, प्रा. सीताराम मुरकुटे व ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते.

**डॉ. किरण पिंगळे**
**बहिशाल शिक्षण मंडळ**